प्रेस नोट दि. १६/१०/२०२०.

रबाळे MIDC पोलीस ठाणे, नवी मुंबई

## १३३ कामगारांचे कोव्हीड–१९ RTPCR टेस्ट चे बनावट अहवाल सादर करून फसवणुक करणारे गुन्हेगारांना अटक

**प्रकरणाची हकिकत**

रबाळे MIDC पोलीस ठाणे हद्दीतील प्रविण इंडस्ट्रीज प्लॉट नं आर–५५, ५९, ६०, ६३ टि.टि.सी. इंडस्ट्रीज ऐरीया रबाले MIDC, नवी मुंबई या कंपनीतील १३३ कामगारांचे कोव्हीड–१९ RTPCR टेस्ट अहवाल करणे करीता मिडटाउन डायग्नोस्टीक लॅबरेटरी, ठाणे चे मालक श्री देवीदास घुले यांना सांगीतले होते. त्याप्रमाणे देवीदास घुले यांनी त्यांचे सहकारी परफेक्ट हेल्थ पॅथॉलॉजी, कल्याण चे मालक महमद वसीम असलम शेख यांच्या संगणमताने नमुद कंपनीमध्ये दिनांक ०८/०४/२०२१ रोजी कॅम्पचे आयोजन केले. कॅम्पमध्ये सदर कंपनीतील एकुण १३३ कामगारांचे RTPCR टेस्टसाठी स्वॅब गोळा केले. थायरोकेअर लॅब तुर्भे यांनी RTPCR टेस्टसाठी नागरिकांच्या स्वॅब गोळा करुन तपासणीसाठी त्यांचेकडे पाठविण्याचे अधिकार परफेक्ट हेल्थ पॅथॉलॉजी चे मालक महमद वसीम असलम शेख यांना दिले आहेत. त्यानुसार सदर स्वॅब थायरो केअर लॅब, टि.टि.सी. इंडस्ट्रीज ऐरीया तुर्भे एमआयडीसी, नवी मुंबई या कंपनीत टेस्टींग करीता पाठविणे आवश्यक असताना तसे न करता परस्पर थायरोकेअर लॅब च्या लेटरहेडचा वापर करून त्याचेवर नमुद १३३ कामगारांचे कोव्हीड–१९ RTPCR टेस्टचे बनावट अहवाल प्रत्येकास स्वतंत्र बारकोड नुसार न देता ते एकाच बारकोड नुसार NOT DETECTED (NEGATIVE) असे सादर करून कामगारांचे आरोग्याची हेळसांड करून त्यांचे आरोग्य धोक्यात आणले. प्रविण इंडस्ट्रि कंपनीतील कामगारांचे RTPCR टेस्ट करिता प्रत्येकी ६५०/–रू प्रमाणे एकुण ८६,४५०/–रू स्विकारून त्यांची व थायरो केअर लॅब कंपनीची फसवणुक करून बदनामी केली. तसेच सध्या सुरू असलेल्या कोव्हीड–१९ संसर्ग संबधाने हयगय व निष्काळजीपणाचे कृत्य केले आहे वगैरे बाबत पोलीस ठाण्याकडे थायरो केअर लॅब कंपनीचे लिगल ॲडव्हायजर श्री बिरूदेव सरवदे यांनी दिनांक १४.०४.२०२१ रोजी तक्रारी अर्ज दिलेला होता. नमुद तक्रारी अर्जाचे अवलोकन करून त्यातील गांभीर्य जाणुन घेऊन त्यांची तात्काळ फिर्याद घेवुन ती गुन्हा रजि क्रं. I १०२/२०२१, भादवी कलम ४१८, ४२०, ४६५, ४६८, ४७०, ४७१, ५००, १८८, २६९, ३४ अन्वये, दि. १४/०४/२०२१ रोजी २१.०८ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हयाचे तपासी अधिकारी पो.निरी.(गुन्हे) रामचंद्र घाडगे यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस अधिकारी व अंमलदार याचें मदतीने नमुद गुन्हयातील आरोपींची माहीती प्राप्त करून तात्काळ ४ तासाचे आत आरोपींना ताब्यात घेवुन त्यांना दिनांक १५.०४.२०२१ रोजी ०१.०० वा. अटक केली आहे. तसेच त्यांनी गुन्हा करणेकामी वापरलेली साधनसामुग्री जप्त केली आहे.

**अटक आरोपींची नावे**

१) देवीदास महादु घुले वय ४४ वर्षे रा. कासम कंम्पाऊंड, नियर विहंग पार्क, शास्त्री नगर, ठाणे.

२) महमद वसीम असलम शेख वय २१ वर्षे रा. टाटा पावर हाऊस, जय मल्हार नगर, तिसवली, कल्याण पुर्व.

**हस्तगत मालमत्ता**

कॉम्पुटर साहीत्य, लॅबरेटरी साहीत्य वगैरे

एकुण हस्तगत मालमत्ता किंमत रू. ७२,०००/–

सदर गुन्हयाचा तपास मा. श्री. बिपीनकुमार सिंह, पोलीस आयुक्त, मा. डॉ. जय जाधव, पोलीस सह आयुक्त, मा. सुरेश मेंगडे, पोलीस उपायुक्त, परि–१, वाशी, मा. विनायक आ. वस्त, सहा.पोलीस आयुक्त, वाशी विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली तसेच नितीन गिते, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यांचे अधिपत्याखाली गुन्हा उघडकीस आणणे कामी पोलीस निरीक्षक रामचंद्र घाडगे, सपोनि यशवंत पाटील, पोहवा/५०७ विश्वास काजरोळकर, पो.हवा. /१२५९ संजय कांबळे पोना/२१४० वैभव पोळ यांनी उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे. सदर गुन्हयांचा अधिक तपास पो.निरी. (गुन्हे) रामचंद्र घाडगे हे करीत आहेत.

---------------